# डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

## कृषी विद्यापीठातील पदवी प्रवेश – २०११-१२

डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत राबविण्यात येणारे बी.एससी.(कृषि), बी.एससी.(उद्यानविद्या), बी.एससी.(वनविद्या), बी.एससी.(कृषि जैवतंत्रज्ञान), बी.एससी.( कृषि व्यवसाय व्यवस्थापन), बी.टेक. (कृषि अभियांत्रिकी), बी.टेक.(अन्नतंत्रज्ञान) या पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेमार्फत केंद्रीय पध्दतीने राबविण्यात येत आहे. प्रवेश पात्रता १२ वी विज्ञान असून सर्व अभ्यासक्रमांचे माध्यम इंग्रजी भाषेत राहील.

वरील अभ्यासक्रमाकरीता लागणारी शैक्षणिक पात्रता, महाविद्यालये, प्रवेश क्षमता, जागांचे आरक्षण इत्यादि सविस्तर तपशिला साठी 'माहिती पुस्तिका २०११-१२'चे अवलोकन 'http://oasis.mkcl.org/agriug ' या संकेतस्थळावर करावे.

सन २०११-१२ या शैक्षणिक वर्षाची प्रवेश प्रक्रिया महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित, पुणे (मज्ञाम) यांचेद्वारे ऑनलाईन पध्दतीने पूर्ण करण्यात येणार आहे. प्रवेश माहिती पुस्तिका कृषि परिषदे व मज्ञाम च्या अनुक्रमे www.mcaer.org किंवा http://oasis.mkcl.org/agriug दिलेली आहे. ऑनलाईन पध्दतीने संगणकावर अर्ज भरण्याची अंतीम दिनांक २५.०६.२०११ आहे.

याद्वारे प्रवेशोच्छुकांना कळविण्यात येते की,वरील संकेतस्थळावरून प्रवेश माहिती पुस्तिका प्राप्त करून घ्यावी. प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी प्रवेश अर्ज, आवश्यक त्या सर्व कागदपत्रांच्या स्वाक्षांकित (अॅटेस्टेड) प्रती जोडून आवश्यक त्या धनाकर्षासह, महाराष्ट्र ज्ञान महामंडळाच्या नागपूर/ अकोला/ बीड/ जळगाव/ नवीन पनवेल/ पुणे यापैकी कोणत्याही एका प्रवेश अर्ज स्वीकृत केंद्राकडे पोचदेय टपालाने (RPAD) अथवा कुरीयर सेवेमार्फत दिनांक ३०/०६/२०११ पर्यत प्रवेश अर्ज पाठवावा. ज्या प्रवेश अर्ज स्वीकृत केंद्राकडे उमेदवार त्याचा प्रवेश अर्ज पाठविणार असेल त्या ठिकाणी MKCL या नावाने देय असलेला धनाकर्ष सोबत जोडणे अत्यावश्यक आहे.

प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी प्रवेश अर्जासोबत भरावयाचे शुल्क खुल्या प्रवर्गासाठी रू.६००/- व आरक्षित प्रवर्गासाठी रू.३००/- असुन (अ.जा.,अ.ज.,वि.जा.*,भ.ज.*, इ.मा.व.*, वि.मा.व.*,) (*उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र अनिवार्य.)

स्वाक्षरीत<br>कुलसचिव,<br>डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

अकोला<br>दिनांक २७/०५/२०११